**एस.सी.सी. नं. २७३८/२०१६**
**निशाणी कमांक:-६३**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१० याचा शपथेवर सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री. ए. पी. नागरे यांचेमार्फत सुरु:-**

**देवा शपथ खरे सांगतो की,**

| | |
|---|---|
| **माझे नाव** | **:- सोमनाथ भगवान जायभाये** |
| **वय** | **:-** ४४ वर्षे, |
| **धंदा** | **:-** नोकरी, पोलीस कॉन्स्टेबल, ब.न.१५९ |
| **नेमणुक** | **:-** राहुरी पोलीस स्टेशन,ता.राहुरी जि. अहमदनगर |

सन २०१६ साली मी लोणी पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. गु.र.न.११०/२०१६ चा तपास माझ्याकडे तोंडी वरीष्ठांच्या आदेशान्वये ठाणे अंमलदार यांनी सोपविला. दोन पंचासमक्ष घटनास्थळी जावुन मी घटनास्थळ पंचनामा केला. लोणी ते संगमनेर रस्त्यावर अभियांत्रिकी महाविद्यालयासमोर घटनास्थळ होते. तो पंचनामा (निशाणी क्र.२१) आता मला दाखविला. त्यावर माझी व पंचाची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. घटनास्थळी असणारी फोरेक्स मोटारसायकल एम.एच.१७, १५३४ व इंडीका गाडी क्र.एम.एच.०४, सी.जे.६४३४ पोलीस ठाण्याला आणली. दोन्ही वाहनांचा जप्ती पंचनामा (निशाणी क्र.२५) मी दोन पंचासमक्ष पोलीस ठाण्यात केला. तो मला आता दाखविला. त्यावर माझी व दोन पंचाची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर दोन्ही वाहनांची मी तांत्रिक तपासणी करून घेतली. तांत्रिक तपासणी अहवाल प्राप्त केले. आता मला अहवाल दाखविले. ते तेच आहेत. दोन्ही वाहने बंधपत्राने मुळ मालकास परत दिलली. ती बंधपत्रे आता मला दाखविली. त्यावर वाहन मालकांच्या सहया आहेत. मी स्वत: हि वाहने ताब्यात दिली आहेत. बंधपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.६५ व ६६** देण्यात येते. मी वाहनांचे छायाचित्रे काढली होती. ती आता मला दाखविली. ती तीच आहेत. त्यास ओळखीपुरते **आर्टिकल अ व ब** देण्यात येते. जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले. मागणी कामी पाठविलेले पत्र मला आता दाखविले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी कं.६७** देण्यात येते.

मी साक्षीदारांचा पुरवणी जबाब घेतला होता. त्यामध्ये आरोपीचे नाव तुषार खर्डे असल्याचे समजले. तपासाअंती इंडीका गाडीचा चालक आरोपी याने अविचाराने व भरधाव

वेगाने गाडी चालवुन मोटारसायकलला धडक देवुन मोटारसायकल स्वारास जखमी करून मोटारसायकलचे नुकसान केल्याचे निष्पन्न झाले. तसेच अपघाताची खबर न देता गाडी सोडुन तेथुन पळुन गेल्याचे निष्पन्न झाले. आरोपीला मी अटक केली. तसा अटकेचा पंचनामा मी केला. तो आता मला दाखविला. त्यावर माझी, आरोपीची व दोन पंचांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रं.६७** देण्यात येते. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आज आरोपी गैरहजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.पी.डी.बेंद्रे यांचे तर्फे:-**

मी लोणी पोलीस ठाण्यात सहा वर्षे काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे लोणी टाउनबीट मध्ये येते. सन २०१२ ते २०१८ या कालावधीत मी लोणी टाउनबीटमध्ये काम केले. गुन्हयाचा तपास कोणता तारखेला माझ्याकडे सोपविला ती नेमकी तारीख मला सांगता येणार नाही. माझ्याकडे तपास सोपविण्यापुर्वी मला एका हवालदाराने या अपघाताची माहिती दिली होती. घटनास्थळ पंचनामा घटना घडली त्याच दिवशी मी घटनास्थळी जावुन केला. त्या दिवशी संध्याकाळी अंदाजे ०५.०० वाजता पंचनामा सुरू केला होता. दिड ते दोन तास पंचनामा सुरू होता. शेख व पठाण असे दोन पंच माझ्यासोबत होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीनेच या दोन पंचांची माहिती मला दिली होती. घटना घडली त्याच दिवशी मी दोन्ही वाहने मी पोलीस ठाण्यात घेवुन आलो. वाहन जप्त व तांत्रिक तपासणी राहिली असलयाने त्याच दिवशी मुददेमाल पावती फाडली नाही. १० तारखेला तांत्रिक तपासणी झाल्यावर त्याच दिवशी पंचनामा करून वाहन ताब्यात दिले. पंचनाम्यातील अक्षर माझे नाही परंतु पंचनामा मीच केला. ज्याने तांत्रिक तपासणी केली ते ठिकाण पोलीस ठाण्याच्या जवळ आहे. ते कोणाच्या मालकीचे आहे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, राज मोटर्स हे पोलीस ठाण्याजवळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाहन तांत्रिक तपासणीसाठी प्रत्यक्ष न देता खोटी प्रमाणपत्रे मी घेतली. एक जखमी फिर्याद देण्यासाठी पोलीस ठाण्यात आला होता. दुस-या जखमीचा जबाब मी नोंदविला. इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले तेव्हाच त्याचाही जबाब नोंदविला होता. वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केली असल्याने जखमी साक्षीदारांची डिस्चार्जची कागदपत्रे मी घेतली नाहीत.

प्रश्न:- फिर्यादी अहमद चौघुले याने नाशिक येथील सुयोग हॉस्पीटल येथे उपचार घेतल्याचा मजकुर मी केवळ त्याच्या तोंडी माहितीवरून फिर्यादीत लिहीला ?

उत्तर:- त्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र आम्ही जोडले आहे.

वैद्यकिय प्रमाणपत्रावर अपघात झाल्याची वेळ डॉक्टर नातेवाईकांकडे चौकशी करून टाकतात. फिर्यादीने कशाने अपघात झाला व किती वाजता झाला हे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, २०१६ साली अपघात घडला तेव्हा लोणी संगमनेर रस्ता हा एकेरी होता व त्यावर दुभाजक नव्हते. त्यावेळी अभियांत्रिकी महाविद्यालय व आयटीआय यांचेसमोर गतीरोधक होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. आर्टिकल अ चे चारही बाजुनी फोटो घेतले असुन आर्टिकल ब चे दोन बाजुनी फोटो दाखल आहेत. मोटारसायकलीच्या छायाचित्रात इंडीकेटर तुटल्याचे दिसते. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या जवळच्या लोकांचा जबाब नोंदविला व घटनास्थळाजवळील कोणाचाही जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या जवळ दत्तु सोपान भाणे यांची वस्ती आहे. त्यांचे जबाब मी घेतला नाही कारण घटना घडली तेव्हा ते घरी नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांचे जबाब व पुरवणी जबाब नोंदविल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मी पोलीस ठाण्यात बसुन केला. हे म्हणणे खरे नाही की, तपासात आरोपी दोषी असल्याचे मी खोटे सांगत असुन मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा गुन्हयाशी कोणताही संबंध नसुन मी खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

दिनांक :- २६/०९/२०२४

( अं. आ. कुलकर्णी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता
(न्यायालय क्र.२)